International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# केवड गावात प्राप्त झालेले सातवाहनकालीन पुरातत्वीय अवशेष : प्राचीन मानवाच्या 'मनोविकासाचा' मागोवा

**मयूर दत्तात्रय चव्हाण**
*संशोधक विद्यार्थी*
*Corresponding Author – मयूर दत्तात्रय चव्हाण*

DOI - 10.5281/zenodo.18709619

सोलापूर आणि आहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) या दोन जिल्ह्यांमधून वाहणा-या तथा दोन्ही जिल्ह्यांतील अनेक गावांची जीवनवाहिनी असलेल्या सीना नदीचा काठ हजारो वर्षांचा इतिहास स्वतःत समेटून आहे. या नदीच्या काठावर बहरास आलेल्या भूभागास 'सिनथडी' या परंपरागत नामाभिधानानेही संबोधले जाते. सोलापूर जिल्ह्यातील 'माढा' तालुक्यातील बव्हंशी गावे सीनाकाठावर वसलेली असल्याने माढा तालुक्याची जीवनवाहिनी म्हणून सीना नदीस ओळखले जाते.माढा तालुक्यातील सीना खोर्यातील 'वाकाव' या खेड्यात २०१० ते २०११ या दरम्यान सोलापूर विद्यापीठाच्या इतिहास विभागाने उत्खनन केले असता या ठिकाणी साधारण २००० वर्षांपूर्वीचे मानवी वसाहतीचे अवशेष प्राप्त झाले व त्या सोबतच या ठिकाणी सातवाहन काळ ते सलग मध्ययुगीन वसाहतीच्या खुणा सांगणारेही अवशेष प्राप्त झाल्याने सिनथडीचा उत्तर मौर्यकालीन ते मध्ययुगीन इतिहास उजेडात आला.वाकाव येथे प्राप्त झालेल्या अवशेषांवरून संशोधकांनी या गावात सातवाहन कालीन व उत्तर सातावाहन कालीन वसाहत असल्याचे निदर्शनास आणून सीना नदीच्या खोर्याचे पुरातत्वीय महत्व अधोरेखित केले. असे असतानाच सीना नदीच्या काठावर स्थित असलेल्या 'केवड'(ता.माढा,जि.सोलापूर) या गावाचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करत असताना नदी काठावरील भैरवनाथ जोगेश्वरी मंदिराच्या टेकडी जवळील परिसरात मातीखाली गाडले गेलेले काही वैशिष्ट्यपूर्ण अवशेष माझ्या प्रत्यक्ष निदर्शनास आले,ज्यांवर सखोल संशोधन केले असता सदर अवशेष हा सातवाहनकालीन 'पाटा वरवंटा' आहे हे शोधाअंती लक्षात आले व हा अवशेष या ठिकाणी सातवाहनकालीन लोकवसाहत नांदत असल्याचे निर्देश देत असल्याचे दिसून आले.केवड जवळच हाकेच्या अंतरावर असलेल्या वाकाव या गावात झालेल्या उत्खननाला व तेथे प्राप्त झालेल्या अवशेषांना व त्यातून निघालेल्या निष्कर्षांना केवड येथे प्राप्त झालेला अवशेष दुजोरा देत असल्याचे माझ्या शोधा अंती मला दिसून आले.त्याचाच सविस्तर आढावा येथे देण्यात येत आहे.

आपण इतिहासाचा अभ्यास करतो ते मुख्यत्वे मानवी जीवनाच्या लाखो वर्षांच्या इतिहासातील प्रत्येक टप्प्यात बदलत गेलेल्या मानवी जीवनशैलीचा व त्याला कारणीभूत ठरलेल्या विकसनशील मानवी बुद्धीचा मागोवा घेण्यासाठी व वर्तमानासोबत त्यांची सांगड घालून या बदलत्या जीवनशैलीस अधिक विकसित करण्यासाठी. आज इतिहास व पुरातत्वाच्या अनेक शाखा निर्माण झाल्या आहेत व संशोधनात प्राप्त झालेल्या प्रत्येक घटकाकडे पाहताना केवळ परंपरागत संशोधन पद्धतीने न पाहता त्यास आधुनिक संशोधनाच्या प्रत्येक सचोटीत बसवून पाहणे व निष्कर्ष काढणे ही आजची प्रगत संशोधन पद्धती आपण

अंगीकारत आहोत.मानवी इतिहासाच्या प्रारंभापासून जेव्हा आपण सुरुवात करतो तेव्हा इतिहासाचे मुख्यतः चार कालखंड आपण समोर ठेवतो-पुराश्मयुगीन, अश्मयुगीन,मध्याश्मयुगीन,नवाश्मयुगीन(या कालखंडांचेही उपकालखंड गृहीत धरून) यालाच आपण 'प्रागैतिहास' म्हणतो,अर्थातच 'प्रगत अवस्थेकडे' होत आलेले मार्गक्रमण, ज्यास इतिहासपूर्वकाळ असेही म्हणतात! हा कालक्रम अभ्यासणे म्हणजेच 'मानवी बौद्धिक विकासाचा'च मागोवा घेणे! अश्माच्या/दगडाच्या वापरापासून सुरु झालेले युग ते अश्मयुग, मानवाने सर्वात आधी दैनंदिन वापरात आणलेली व त्याच्या बौद्धिक विकासाचा प्रारंभिक टप्पा सांगणारी आदिम वस्तू म्हणजेच दगड,म्हणून पुरातत्वात प्रागैतिहासिक दगडी वस्तूंना अनन्यसाधारण महत्व आहे. दगडी हत्यारे व अवजारांचा अभ्यास हा तर पुरातत्वात अविभाज्य घटक आहे. पण केवळ दगडी हत्यारांपुरतेच न थांबता इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यात मानवाने दगडाला कोणकोणत्या अंगाने घडवले हे जाणण्याचा मागोवा अत्यंत रंजक आहे. दगडांच्या बदलत गेलेल्या आकारांचा व मानवाच्या स्वयंपाक घरात त्याने प्रवेश करण्याचा मागोवा घेणे हाच माझ्या या संशोधनाचा मुख्य विषय आहे त्याचे कारण म्हणजे 'केवड येथे सापडलेला सातवाहन कालीन दगडी पाटावरवंटा' हे होय जो भग्नावस्थेत पण एकत्र प्राप्त झाला आहे, या दगडी वस्तूच्या जडणघडणीस प्रागैतिहासिक परंपरा आहे,त्याचाच आढावा आता आपण पाहू.

भारतीय इतिहासात प्रागैतिहासिक गुहाचित्रनाचे अनन्यसाधारण महत्व आहे.मध्यप्रदेशातील कठोतिया गुहाचित्रनाचे बारकाईने आकलन केल्यास दिसून येते कि या मध्याश्मयुगीन चित्रसमुहात एक व्यक्ती पाटा वरवंट्याच्या सहायाने काहीतरी प्रक्रिया करत आहे,न्युमायर यांनी याकडे लक्ष वेधले होते[१]. याचाच अर्थ प्रागैतिहासिक भारतीयांनी आपल्या दैनंदिन जीवनात दगडाला केवळ हत्यार म्हणूनच वापरले नाही तर त्यास नित्य स्वयंपाकाच्या क्रियाकालापातही सामावून घेतले होते. कठोतिया गुहाचित्रनात स्पष्टपणे एक व्यक्ती आडव्या दगडावर फळे किंवा अन्यकाही चीजवस्तू भरडताना दिसत आहे. यावरून अभ्यासकांनी असा निष्कर्ष काढला की मध्याश्मयुग व नवाश्मयुगाच्या स्थित्यंतरात जेव्हा मानव भटक्या अवस्थेतून पशुपालक व शेतकरी या अवस्थेकडे मार्गक्रमण करत होता त्या काळी स्थिर अवस्थेतच मानवास खाद्य पदार्थांची उपलब्धी सहज होऊ लागली होती, तो स्वतःचे अन्न स्वतः पिकवू लागला होता व अन्नसंग्रहणासाठी मानवाचे भटकणे थांबले होते.शेतात धान्ये पिकवणे व धान्यांची साठवणूक करणे यामुळे मानवी जीवनास स्थिरता प्राप्त झाली[३]. याच धान्यांचे सेवन करण्यासाठी त्यांना भरडणे आवश्यक होते त्यासाठी मानवाने आडव्या दगडावर धान्य भरडण्याची शक्कल लढवली तथापि अन्नावर प्रक्रिया करून ते साठवणे व पुन्हा वापरणेही याच काळात सुरु झाले त्यामुळे मध्याश्मयुग ते नवाश्मयुग याच काळात अन्न साठवणुकीसाठी व त्यावर प्रक्रिया करण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंचा शोध लागला,त्यापैकी एक म्हणजे अन्नधान्य भरडण्यासाठी अत्यावश्यक असलेला पाटावरवंटा व तत्सम जात्या सारखे दगड होत जे तत्कालीन मानवी बौद्धिक विकासनशीलतेचा पुरावा आहेत. हा झाला इतिहासपूर्व काळ! भारतात सिंधू संस्कृती सारख्या नागरी संस्कृती इ.स.पूर्व ४००० दरम्यान बहरास आल्या. त्या काळातील लोकजीवनाच्या खुणा सांगणाऱ्या पुरातत्वीय अवशेषांचा अभ्यास करताना मी आवर्जून सिंधुकालीन स्वयंपाक घरात सापडलेल्या अवशेषांचे आकलन केले, या काळात दगडी पाटा वरवंट्याच्या रचनेत आमुलाग्र बदल झालेले दिसून येतात. पूर्वीच्या ओबडधोबड अवस्थेतून आता पाट्यांचा आकार पसरट लंबचौकोनी होऊन ते

हाताळण्यास सोपस्कर झाले होते व त्यास आधाराला पाय देण्यात आले होते,वरवंटेही आता गोलाकार व निमुळते झाले होते. सिंधू संस्कृतीच्या उत्खननात असे पाटे हरप्पा,मोहेंजोदारो,कोटदिजी,रावी नदीचे खोरे आदी ठिकाणी अवगत झाले आहेत[४]. भारताच्या दुसऱ्या नागरीकरणाचा इतिहास सांगणारी काही वैशिष्ट्यपूर्ण शिल्पे अभ्यासताना दिसून येते कि मौर्य वा उत्तर मौर्य काळात पाट्यांना आत चारही बाजूंनी आधार म्हणून उंच चार पाय देण्यात आले होते,जेणेकरून त्यावर क्रिया करताना तो डगमगू नये व वापरणारास तो सहजगत्या वापरता यावा,अशा पद्धतीचे एक शिल्पांकन *सांची(मध्यप्रदेश) येथील स्तुपाच्या पश्चिमेकडील शिल्पपटात दिसून येते ज्यात एक स्त्री चारपायी पाट्याचा वापर करताना दिसत आहे,हे शिल्प साधारण इ.स.पूर्व २रे शतक या काळातील आहे असे अभ्यासक मानतात(*न्युमायर पूर्वोक्त),अर्थात या काळत मौर्य सत्तेचे पतन होऊन दक्खन पठारावर सातवाहनांची सत्ता स्थापित होऊ लागली होती. सातवाहन काळ म्हणजे मराठी संस्कृतीचे उत्कर्षपर्वच! या काळातील पुरातत्वीय अवशेष ज्या ज्या ठिकाणी सापडले आहेत तेथील उत्खनीत वस्तूंमधील विशेषतः सातवाहन कालीन पाटा वरवंट्याचा मी बारकाईने अभ्यास केला,त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे सातवाहन कालीन पाटे हे लंबचौकोनी, असून त्यांना चारही बाजूनी चार पाय आहेत,पाय जमिनीपासून उंच असल्याने मध्यभागी भांडे ठेऊन त्यात पाट्यावरील वाटण सहज उतरवता येते, पाट्याच्या एका बाजूस पसरट माया ठेवली असून वाटलेला पदार्थ खालच्या भांड्यात सहजगत्या काढून घेता येतो अशी रचना ठेवण्यात आली आहे,सांची स्तूपातील उपरोल्लेखित शिल्पात असाच पाटा दर्शविला आहे, तत्पुर्व सिंधु संस्कृतीच्या उत्खननात सापडलेले चारपायी पाटे अशाच धाटणीचे आहेत हे वर सांगितले आहेच. सातवाहन कालीन काही पाट्यांवर बौद्ध मानचिन्हे आढळतात,अशा पद्धतीचे पाटे तेर व भोकरदन येथे आढळतात.सातवाहन काळातील पाटे पैठण,नाशिक,जुन्नर,नेवासे,कौंडीन्यपूर,नावडातोडी,रायर व अगदी तक्षशीला येथेही अवगत झाले आहेत[५], तथापि तेलंगणा मधील कोलनकुप येथेही उत्तर सातवाहनकालीन उर्फ इक्ष्वाकू कालीन पाटे व जाती अवगत झाली आहेत[६]. यावरून चारपायी पाट्यांचा वापर उत्तर मौर्य काळात व प्रामुख्याने सातवाहन काळात अगदी सार्वजनिकरीत्या होऊ लागला होता हे दिसते,या विकसनशील कलेचा वारसा सिंधू संस्कृती व तत्पुर्व मध्याश्मयुगापर्यंत मागे घेऊन जातो व बदलत्या मानवी जीवनाचा व मानवी बौद्धिक विकसनशीलतेचा,प्राचीन मानवाच्या मनोविकासाचा पट आपल्या समोर ठेवतो.

प्रस्तुत संशोधनाचा मूळ विषय हा केवड येथे मला प्राप्त झालेल्या सातवाहन कालीन पाट्यांसंबंधित आहे. केवड(ता.माढा,जि.सोलापूर) गावी सापडलेले दोन पाट्यांचे अवशेष व सातवाहन काळातील इतर स्थळांमध्ये सापडलेले पाटे यात प्रचंड साम्य आहेच.केवड येथील चारपायी पाटा साधारण सव्वा फुट लांब व ८ ते ९ इंच रुंद आहे, एक पाटा मध्यभागी भग्न झाला आहे तर दुसऱ्याचा एकच भाग सापडला आहे, पाट्याचे पाय जमिनीपासून ३-४ इंच उंच ठेवण्यात आलेले असून पुढच्या व मागच्या पायांत मध्यभागी बरेच अंतर ठेवले आहे,तथापि एका बाजूस माया ठेवली असून वाटलेला पदार्थ सहजरीत्या खालच्या भांड्यात उतरवता येईल अशी रचना केलेली आहे. केवड मध्ये सातवाहन कालीन वस्तू सापडणे अगदी साहजिक असण्याचे कारण म्हणजे केवड गावाला अगदी लागुनच असलेल्या वाकाव(ता.माढा) या गावात सोलापूर विद्यापीठाच्या इतिहास विभागाकडून झालेल्या उत्खननात सातवाहन कालीन वसाहतीचे अवशेष अवगत झाले होते हे सुरुवातीलाच सांगितले आहे. लाल रंगाच्या खापरांचे तुकडे

वाकाव येथे मिळाले होते जे सातवाहनकालीन असल्याचे अभ्यासकांनी नोंदवले आहे[७]. दोन्ही गावे एकमेकापासून केवळ हाकेच्या अंतरावरच आहेत,त्यामुळे वाकाव येथे ज्या काळात सातवाहन कालीन वसाहत नांदत होती त्याच वेळी केवड गावाशीही तिचा घनिष्ठ संबंध येणे अगदी स्वाभाविक आहे, शिवाय एकाच वेळी वाकाव आणि केवड या दोन्ही गावात तेव्हा लोकवसाहात नांदत असणे शक्य आहे, त्याचे कारण म्हणजे केवड येथे सापडलेला सातवाहन कालीन पाटा होय(छायाचित्र १) तथापि तो ज्या ठिकाणी सापडला आहे त्या ठिकाणी सध्या भैरवनाथ जोगेश्वरी या दैवतांचे मंदिर आहे जे केवडचे ग्रामदैवत आहे,हे मंदिर अगदी नदीकाठाला लागूनच असून पांढऱ्या मातीच्या छोट्या टेकडीवर स्थित आहे,पुरातत्वीय संशोधनात पांढऱ्या मातीच्या टेकड्यांचे/उंचवट्याचे महत्व काय आहे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. जेव्हा एखादी प्राचीन वसाहत काही कारणांनी उजाड होते वा तेथील लोक इतर ठिकाणी स्थलांतर करतात तेव्हा मागे राहिलेल्या अवशेषांचे रुपांतर मातीच्या ढिगाऱ्यात होते,पुरातत्वीय संशोधनात अशा ठिकाणांना अनन्यसाधारण महत्व आहे हे आपण जाणतो. केवड येथे सापडलेला सातवाहन कालीन पाटा, गावाच्या नदीकडील भागात असलेला उपरोक्त पांढऱ्या मातीचा(पांढऱ्या व काळ्या संमिश्र) उंचवटा यांकडे पाहता निश्चितच केवड येथे सातवाहन काळात वा उत्तर सातवाहन काळात प्राचीन लोकवसाहत असावी असे साधार म्हणता येते. या अंगाने मी अतिरिक्त संशोधन करत आहे. या शोध कार्यात मला माढा येथील माझे सन्मित्र विजय नागनाथ ठोंबरे व केवड येथील सन्मित्र गणेश लटके यांनी सहकार्य केले. केवड येथे सापडलेल्या सदर ऐतिहासिक पुरातत्वीय अवशेषांचे जतन करण्याचे कामी मी स्थानिक पातळीवर जागृती करण्यासाठी प्रयत्न करत आहे व या परिसरात विखुरलेल्या अशा आणखी ऐतिहासिक अवशेषांवर अतिरिक्त संशोधन करत आहे.



**छायाचित्र-१ केवड येथे प्राप्त झालेला सातवाहन कालीन पाटा**



**छायाचित्र २ - पैठण येथे उत्खननात अवगत झालेला सातवाहन कालीन पाटा**

**संदर्भ:**


1. Neumayer, E. 2001. Rock art studies in India. In M. Lorblanchet (Ed.), Rock art in the Old World: Papers presented in Symposium A of the AURA Congress, Darwin, Australia, 1988 (pp. 215–248). Aryan Books International, New Delhi.
2. मोरवंचीकर रा.श्री.- सातवाहन कालीन महाराष्ट्र,अपरांत प्रकाशन,२०१७,पृ.२७७
3. History of Agriculture in India, Up to C.1200 A.D Author:Vinod Chandra Srivastava, Editor:Lallanji Gopal,Project of History of Indian Science,Philosophy and Culture 2008
4. Grindingstone Acquisition Networks, New Introductory Paragraph by Randall Law, 2024,Harappa.com- https://www.harappa.com/
5. मोरवंचीकर पूर्वोक्त
6. The New Times Of India,18 sept.2024
7. Joglekar, P. P. & Patil-Shahapurkar,Maya, *'A Preliminary Report on the Excavation at Wakav, Solapur District, Maharashtra* (2010-2011)', *Purattava,* 41: 159-167, Plates 24-26, 2011.
8. Aswani O. K. and Preeta Nayar, A Glimpse of the Grinding and Pounding Tools in the Early Indian Art, Department of Archaeology, University of Kerala, Kariavattom Campus, Thiruvananthapuram, Kerala – 695 581, India, Received: 21 July 2023; Revised: 18 October 2023; Accepted: 27 November 2023 Heritage: Journal of Multidisciplinary Studies in Archaeology 11.2 (2023-24): 427-447
9. Morwanchikar R.S., *Paithan Through the Ages*,1987
10. प्रस्तुत संशोधनासाठी प्रत्यक्ष सर्वेक्षण व क्षेत्रभेट दिली असून केवड व वाकव या गावांचे संशोधनात्मक सर्वेक्षण करण्यात आले आहे.